सकाळ

विशेष

डॉ. वीरेंद्र ताटके



# 'एमबीए'तील यशासाठी त्रिसूत्री

गेल्या काही वर्षांत 'एमबीए' अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वेगाने वाढत आहे. विविध क्षेत्रांतील नोकरीची वाढती संधी, आकर्षक पगार, नोकरीत बढतीची संधी, स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची संधी यामुळे 'एमबीए'ला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. अर्थात, 'एमबीए' अभ्यासक्रमाला केवळ प्रवेश घेतला किंवा अभ्यासक्रम पूर्ण केला म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला लगेच उत्तम पगाराची नोकरी मिळेल असे नाही. 'एमबीए' अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांनी कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स आणि कन्टेन्ट ही त्रिसूत्री अंगीकारली तर त्यांना यश मिळणे सोपे जाते

## १ कम्युनिकेशन

'एमबीए' अभ्यासक्रमातील प्रत्येक विद्यार्थांसाठी उत्तम संभाषण कौशल्य अनिवार्य झाले आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कॉर्पोरेट जगात प्रवेश करण्याची पहिली पायरी म्हणजे मुलाखत! तिथे विद्यार्थ्याला आवश्यक संभाषण कौशल्य दाखवता आले नाही, तर त्याच्या निवडीची शक्यता कमी होते. नोकरी करताना कंपनीतील सहकारी, वरिष्ठ, कंपनीचे ग्राहक यांच्याशी संपर्क साधण्यासाठी संवाद साधणे गरजेचे असते. यासाठी स्वतःचे ज्ञान, वर्तमान घडामोडींबद्दल माहिती वाढवण्यासाठी विविध विषयांबद्दल वाचन करणे आवश्यक आहे. यामुळे शब्दसंग्रह तर वाढतोच. त्याचप्रमाणे वाक्यरचना कशी करावी हे समजण्यास मदत होते. याची सवय 'एमबीए' अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याआधीपासूनच करायला हवी आणि त्यात हळूहळू सुधारणा करण्याचा सातत्याने प्रयत्न करावा.

## २ कॉन्फिडन्स

नोकरी मिळवण्यासाठी आणि त्यात यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वासाची गरज असते. आत्मविश्वास वाढविण्यासाठी विद्यार्थीदशेत असल्यापासूनच काही सवयी लावून घेणे आवश्यक आहे. तुम्ही एखादे काम वेळेत पूर्ण करण्याचे आश्वासन कोणाला दिले असल्यास आपल्या शब्दांवर ठाम राहा आणि ठरलेल्या वेळेत काम पूर्ण करण्याचा पूर्ण क्षमतेने प्रयत्न करा. असे केल्याने आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. तसेच, तुमच्याबद्दलचा दृष्टिकोन सकारात्मक होईल आणि तुमची विश्वासर्हता वाढेल. याशिवाय ज्या गोष्टी आपल्याला माहीत नाहीत, परंतु त्यांचा उपयोग आपल्याला भविष्यात नोकरी व्यवसायामध्ये होऊ शकतो अशा गोष्टी शिकून घेतल्या पाहिजेत. त्यामुळे आपल्या ज्ञानात भर तर पडतेच, आपला आत्मविश्वासही वाढतो.

## ३ कन्टेन्ट

कम्युनिकेशन आणि कॉन्फिडन्स वाढविण्यासाठी सर्वांत चांगला मार्ग म्हणजे अभ्यास वाढवणे. 'एमबीए' अभ्यासक्रमात त्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध असतात. ग्रुप डिस्कशन, मॉक इंटरव्ह्यू, रोल प्ले या नेहमीच्या पर्यायांसोबत नवनवीन स्किल्स शिकून घेणे फायद्याचे ठरते. अलीकडील काळात उदयास आलेली आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी, बिझनेस अॅनॅलिटीक्स, डेटा सायन्स, प्रॉडक्ट मॅनेजमेंट यासारखी तंत्रे शिकून घेणे फायद्याचे ठरेल. यासारखे तंत्रज्ञान आत्मसात केल्याने आपला आत्मविश्वास वाढतोच आणि आपल्या संभाषणामध्येही सुसूत्रता येण्यास मदत होते.

'एमबीए' अभ्यासक्रम हे केवळ पुस्तकी शिक्षण नसून त्यातून विद्यार्थ्यांने भविष्यातील संभाव्य आव्हानाला तोंड देण्यासाठी सज्ज होणे अपेक्षित असते. त्या दृष्टीने कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स आणि कन्टेन्ट ही त्रिसूत्री वापरून प्रत्येक विद्यार्थी यशाच्या दिशेने वाटचाल करू शकतो.

**(लेखक इंदिरा बिझनेस स्कूल या संस्थेत संचालक आहेत.)**